# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १४२-२३** **दिनांक :- १०/०५/२०२३**

## महिलेच्या आवाजात बोलुन लोकांची फसवणुक करणाऱ्या आरोपीतांस अटक
## गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा युनिटची कामगिरी.

----ooooo----

दिनांक ०७/०५/२०२३ रोजी आरोपी याने महिलेच्या आवाजात श्रीराम ज्वेलर्सचे मालक यांचेशी फोनद्वारे संपर्क करुन, ती डॉक्टर असल्याचे सांगुन, तिला ४ तोळे वजनाच्या बांगडया बनवायची ऑर्डर देण्याचे खोटे सांगुन, त्यांना साई आशिर्वाद हॉस्पीटल येथे बोलावून २ लाख ॲडव्हॉन्स देते व हॉस्पीटलसाठी २ लाख रुपये सुट्टे करण्याचा बहाणा करुन बोलावले असता फिर्यादी हे २ लाख रुपये सुट्टे घेऊन साई आशिर्वाद हॉस्पीटल येथे गेले असता आरोपी यानी फिर्यादीस, डॉक्टर मॅडमने सांगितलेली रक्कम आणली आहे का असे म्हणुन, तु मॅडमची बांगडयाची साईज घेऊन ये व आणलेले पैसे त्याचेकडे देणेस सांगुन त्याचेकडील २ लाख रुपये घेऊन, त्याची फसवणुक करुन निघुन गेले सदरबाबत नवघर पोलीस ठाणेत गुरनं. ३११/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा समांतर तपास करीत असताना तांत्रिक विश्लेषनावरुन महिलेचे आवाजात बोलून फसवणुकीचा गुन्हा करणारे आरोपी १) मनिष शशीकांत आंबेकर, नागीनदासपाडा, नालासोपारा पूर्व, २) अन्वर अली कादीर शेख, कर्जत, जि.रायगड हे निष्पन्न केले व त्यांना अटक करुन त्याचेकडून रोख रक्कम ०९,५५०/- रुपये व एकूण ०३ मोबाईल हस्तगत करणेत आले आहेत. आरोपीतांकडे केलेल्या अधिक चौकशीमध्ये त्यांनी १) नवघर, २) भाईंदर, ३) आचोळे, ४) दादर, मुंबई, ५) लोणीकंद, पूणे ज्वेलर्स, ६) सहकार नगर, पूणे येथे मेडीकल ७) स्वारगेट, पूणे येथील रक्ताच`नाते रक्तपेढी ८) कोपरखैराणे, नवी मुंबई छत्रपती संभाजी महाराज पतपेढी ९) खांदेश्वर, नवी मुंबई मेडीकल १०) खांदेश्वर, नवी मुंबई मराठा ज्वेलर्स ११) मुंबई नाका, नाशिक चितळे स्वीट १२) कळंबोली येथे राधीका ज्वेलर्स १३) शिवाजीचौक पनवेळ ज्वेलर्स दुकानदार १४) शाहुपूरी, कोल्हापूर वेलनेस मेडीकल १५) मिरारोड, शांतीपार्क येथील शबनम ज्वेलर्स तसेच गुजरात राज्य येथील १६) वापी १७) वलसाड १८) काकोदरा, सुरतसिटी,व १९) सुरत रेल्वे स्टेशन जवळील जनरल स्टोर्स येथे असे एकूण १९ ठिकाणी गुन्हे केले असल्याची माहिती दिली आहे. सदर ठिकाणांपैकी खालीलप्रमाणे ०५ पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद असुन उर्वरीत १४ पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज दाखल आहेत.

## : - उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा.रजि.क्र.व कलम |
|---|---|---|
| १. | नवघर पोलीस ठाणे | ३११/२०२३ भादंविसं.कलम-४२० |
| २. | भाईदर पो.ठाणे | ४४४/२०२२ भादंविसं.कलम-४२०,४०६ |
| ३. | नयानगर पो.ठाणे | ४१८/२०२१ भादंविसं.कलम-४२०,३४ |
| ४. | आचोळे पो.ठाणे | ८०/२०२३ भादंविसं.कलम- ४२० |
| ५. | दादर पो.ठाणे मुंबई | १४२/२०२३ भादंविसं.कलम-४२० |

अटक आरोपी मनिष शशीकांत आंबेकर याचा **पुर्व इतिहास**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा.रजि.क्र.व कलम | अ. क्र | पोलीस ठाणे | गुन्हा.रजि.क्र.व कलम |
|---|---|---|---|---|---|
| १. | भांडूप | १२६/२०१९ भादंविसं.कलम ४२० | ६. | माटूंगा | ५६२/२०२२ भादंविसं.कलम ४२० |
| २. | भांडूप | १३०/२०१९ भादंविसं. कलम ४२० | ७. | फसरखाना पूणे | १३६/२०१३ भादंविसं.कलम ४२० |
| ३. | दिंडोशी | २८४/२०२० भादंविसं. कलम ४२० | ८. | दहिसर | ३४२/२०१० भादंविसं.कलम ४२० |
| ४. | मुलूंड | २७/२०२० भादंविसं.कलम ४२० | ९. | गोरेगांव | ४३४/२०१९ भादंविसं.कलम ४२० |
| ५. | माहिम | ९३/२०२१ भादंविसं.कलम ४२० | | | |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीराचे पो.नि. श्री. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, स.फौ संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पो.हवा. संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, समीर यादव, पो.अंम.प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी तसेच पो.अंम. कुणाल सावळे, सायबर विभाग यांनी केली आहे.

